# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## जा हि र नो टी स

या जाहिर सूचनेव्दारे सर्व मालमत्ताधारकांना सूचित करण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मध्ये सुधारणा केल्यानुसार भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कराची आकारणी करुन, त्यानुसार बिले देण्याची प्रक्रिया सुरु आहे. तथापि या प्रक्रियेस विलंब लागत असल्याने, सन 2011-2012 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची बिले "भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता करास अधीन राहून" निर्गमित करण्यांत येत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची प्रकरण 8 नियम 13 (1) व 15 (1) अन्वये मालमत्ता कर आकारणीसंबधी हरकती व सूचना मागविणे आवश्यक आहे. तथापि भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कराची आकारणी करुन त्यानुसार बिले निर्गमित करण्यांत आली नसल्याने, भांडवली मुल्य निर्धारित करुन, त्या मुल्यानुसार सूचना व हरकती अलाहिदा मागविण्यांत येतील.

तथापि मागिल वर्षातील म्हणजे सन 2010-2011 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर आकारणीबाबत मालमत्ताधारकांच्या काही तक्रारी किंवा हरकती असल्यास, त्याबाबत संबंधित मालमत्ताधारकांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसाच्या आत संबंधित प्रभाग कार्यालयात आपली तक्रार / हरकत दाखल करावी.

तसेच या जाहिर सूचनेव्दारे असे जाहिर करण्यांत येत आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील सुधारणेनुसार प्रकरण 8 कराधान नियम 41 (1) अन्वये शास्तीबाबत तरतूद नमूद करण्यांत आली आहे. या तरतुदीनुसार ज्या करदात्याने मागिल वर्षाचा कर भरला नसल्यास मागिल थकबाकीवर 1 एप्रिलपासुन 2% इतकी शास्ती आकारण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणे ज्या करदात्याने पहिल्या सहामाहीच्या बिलाची रक्कम बिल बजाविल्यापासुन तीन महिन्याच्या कालावधीनंतर भरल्यास पहिल्या सहामाहीच्या बिलाच्या रक्कमेवर दरमहा 2% इतकी शास्ती आकारण्यांत येणार आहे. आणि ज्या करदात्याने दुस-या सहामाहीचे बिलाची रक्कम प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबरपूर्वी न भरल्यास दिनांक 1 जानेवारीपासुन दुस-या सहामाहीच्या बिलाच्या रक्कमेवर दरमहा 2% इतकी शास्ती आकारण्यांत येणार आहे.

या जाहिर सूचनेव्दारे सर्व मालमत्ताधारकांस असे सूचित करण्यांत येत आहे की, आपण आपले सन 2011-2012 या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराचे संपुर्ण बिल 15 जुलै,2011 पर्यत भरल्यास, सदर बिलातील दुस-या सहामाहिच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये 5% इतकी तसेच दिनांक 16 जुलै, 2011 नंतर भरल्यास प्रचलित पध्दतीनुसार सूट देण्यात येणार आहे.

सही/-
अतिरिक्त आयुक्त,
ठाणे महानगरपालिका,ठाणे